तरुण भारत
सोमवार, ६ ऑक्टोबर २०१४

# दोडामार्ग कॉलेजमध्ये गवंडळकर, पारकर यांचा कार्यक्रम रंगला

वार्ताहर
दोडामार्ग

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात मराठी भाषा व वाङ्मय मंडळातर्फे हास्यसम्राट अरुण गवंडळकर यांचा हास्यमैफील व रामदास पारकर यांचा 'सिंधुदुर्ग डिस्को' हा मालवणी गीतगायनाचा संयुक्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना गवंडळकरांनी खळखळून हसायला लावले तर रामदास पारकर यांनी आपल्या गीतगायनातून उपस्थितांची पाऊले थिरकायला लावली. जीवनात यशस्वी होण्यासाठी ध्येय ठरवले पाहिजे व ते पूर्ण करण्यासाठी परिश्रमाबरोबरच प्रत्येकाने जीवनाकडे खिलाडूवृत्तीने पाहिले पाहिजे. जीवन सुंदर बनविण्यासाठी विनोदाचा आस्वाद घेणेही महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन गवंडळकर यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या विविध सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळातर्फे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. प्रत्येकाच्या अंगी विनोद दृष्टी, सूत्रसंचालन, अभिनय, नाट्य, गायन, नृत्य, सभाधीटपणा, सकारात्मक दृष्टी, कलाप्रियता, खेळकरवृत्ती आदी गुण विद्यार्थ्यांत रुजण्यासाठी व कलांविषयी आवड निर्माण व्हावे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उदंड प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांचे मनोरंजन करताना डोळ्यात अंजन घालण्याचे काम गवंडळकरांनी केले. त्यांनी अनेक अनुभव कथन केले. कलेची सेवा करताना किशोरकुमार, कविता कृष्णमूर्ती, लक्ष्मीकांत प्यारेलाल, जॉनी लिवर यांची प्रेरणा लाभल्याचे त्यांनी सांगितले.

**हास्यमैफल, सिंधुदुर्ग डिस्को ही मालवणी गायन मैफल**

रामदास पारकर यांनी विविध मालवणी गीते सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढविली. अनेक प्रेमगीते सादर करत आपल्या जोशपूर्ण मालवणी ढंगात नृत्यही केले. मराठा भाषा वाङ्मय मंडळ प्रमुख प्रा. दिलीप बर्वे, डॉ. एस. यु. दरेकर, प्रा. एस. एन. खडपकर, मराठी भाषा मंडळाचे विद्यार्थी प्रतिनिधी भूषण सावंत उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मराठी भाषा वाङ्मय मंडळ सर्व सदस्य, सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा. दिलीप बर्वे यांनी, सूत्रसंचालन अनिल गावडे यांनी तर मुलाखत भूषण सावंत यांनी तर आभार भावना साळकर हिने मानले.